Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Kolhapur-416004
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, ५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
दुरध्वनी क्र - (०२३१) २६९६१०१ / २ / ३ Website - www.sscboardkolhapur.in Email - divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/डीपी/माध्य/निकाल/ 690
दिनांक १६ / ०६ / २०२२

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय: मार्च-एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त (इ.१०वी) प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर करणेबाबतचे प्रकटन.**

मार्च-एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त (इ.१०वी) प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर करणेबाबतच्या प्रकटनाची प्रत या पत्रासोबत जोडलेली आहे. सदर प्रकटनामध्ये नमूद केलेल्या संकेत स्थळावर **शुक्रवार दिनांक १७ जून, २०२२ रोजी दुपारी १.०० वाजता** निकाल ऑनलाईन जाहीर केला जाणार आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

सोबत: प्रकटन

**(दत्तात्रय पोवार)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,**
**कोल्हापूर**

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्रकटन

**विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च -एप्रिल २०२२ चा निकाल**

---

मंडळामार्फत मार्च -एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार जाहीर करण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत मार्च -एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर शुक्रवार, **दिनांक १७/०६/२०२२ रोजी दुपारी ०१.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे.**

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) मार्च -एप्रिल २०२२ परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण खालील संकेतस्थळांवरुन उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट) घेता येईल. **मंडळाने जाहीर केलेल्या अधिकृत संकेतस्थळांचे पत्ते पुढीलप्रमाणे आहेत.**

१. www.mahresult.nic.in
२. http://sscresult.mkcl.org
३. https://ssc.mahresults.org.in
४ https://lokmat.news18.com
५ https://www.indiatoday.in/education-today/results
६ http://mh10.abpmajha.com
७ https://www.tv9marathi.com/board-result-registration-for-result-marksheet-10th

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण उपरोक्त संकेतस्थळांवरुन उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट आऊट) घेता येईल.

**www.mahresult.nic.in** या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या निकालाबरोबरच वेगवेगळी सांख्यिकी माहिती उपलब्ध होईल.

तसेच www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर शाळांना एकत्रित निकाल उपलब्ध होईल.

## सदर निकालाबाबतचा अन्य तपशील पुढीलप्रमाणे-

१) ऑनलाईन निकालानंतर माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वत:च्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रत, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्रासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन (http://verification.mh-ssc.ac.in) स्वत: किंवा शाळांमार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी/शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. गुणपडताळणीसाठी सोमवार, दिनांक २०/०६/२०२२ ते बुधवार, दिनांक २९/०६/२०२२ पर्यंत व छायाप्रतीसाठी सोमवार, दिनांक २०/०६/२०२२ ते शनिवार, दिनांक ०९/०७/२०२२ पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येईल. त्यासोबतच ऑनलाईन पध्दतीने शुल्क (Debit Card/ Credit Card/ UPI/ Net Banking) याद्वारे भरता येईल.

२) मार्च -एप्रिल २०२२ परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

३) मार्च -एप्रिल २०२२ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या दोनच संधी **श्रेणी/गुणसुधार (Class Improvement Scheme)** योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील.

४) जुलै-ऑगस्ट २०२२ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी व श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी सोमवार दिनांक २०/६/२०२२ पासून मंडळाच्या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरुन घेण्यात येणार आहेत. त्याबाबतचे परिपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येणार आहे.

५) मार्च-एप्रिल २०२२ मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका वाटपाबाबत स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

(डॉ अशोक भोसले )
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४.

दिनांक:- १६/०६/२०२२